स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय

देशभक्त के. शंकरराव नवांमकर सायन्स कॉलेज,
रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय आणि
के. सुलोचना श्रीपाद पाटील (M.C.V.C.) कनिष्ठ महाविद्यालय,
मालवण

अस्मिता

२०१९-२०

NAAC Re-Accredited with Grade 'B'

K. S. D. S. Mandal, Malvan

Krushnarao Sitaram Desai Shikshan Mandal, Malvan was established in the year 1914 by Krushnarao Sitaram Desai as 'Womens Education Society', with an objective of providing education to the economically, educationally and socially weaker women of the society. K.S.D.S Mandal is an educational society registered under the Indian Society's Regestration Act of 1860 and also a Public Trust registered under the Bombay Trust Act 1950. It is also registered under section 12(a) od Income Tax Act 1961 and is exempted u/s G of the said act.

K.S.D.S. Mandal is one of the oldest education organisations of Malvan and has done pioneering work in the field od education for weaker sections of the society. Looking years back, the society started with a humble beginning with a Kanyashala for women in a single room with greater hardship, pain and an aim to spread education amongst the economically backward people. Today K.S.D.S. Mandal is serving education facilities to more than students through following institutions,

- Laxmibai Topiwala Kanyashala (1914)
- V.A. Ajgaonkar Sarav Pathshala (1941)
- Sunitadevi Topiwala Adhyapak Vidyalaya (1943)
- S.K. Patil Sindhudurg Mahavidyalaya(1965)
- Rambhau Parulekar Jr. College (1976)
- Late Sulochana Shripad Patil Jr. (M.C.V.C.) College (2014)
- Late Shankararao Gawankar Science College (2016)

K.S.D.S. Mandal has made great progress in the field of academics, sports and extra curricular activities. The infrastructure with beautiful buildings, well equipped Acience laboratories, Libraries, Computer labs, etc. has provided the students a good platform for their educational needs.

K.S.D.S. Mandal, not forgetting its social responcibilities, always strive to help its country and the citizens by actively taking parts in social work by various means such as Tree plantations, Distribution of books, and uniform to poor and needy students, providing free School Bus facility, etc.

K.S.D.S. Mandal Provides moral and value education to its students which enhances the personality of our students and develops self confidence, self respect, service to society and positive attitude toward life.

।। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।।

कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ, मालवण संचलित

नॅक मानांकन 'बी' श्रेणी प्राप्त

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय

देशभक्त कै. शंकरराव गवाणकर सायन्स कॉलेज आणि रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय मालवण

अस्मिता

२०१९-२०

संपादक मंडळ

अध्यक्ष :

मा. प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले

संपादक :

डॉ. उज्ज्वला सामंत

संपादक मंडळ :

प्रा.एच.एम.चौगले

प्रा.एस.पी.खोबरे

प्रा.बी.एच.चौगुले

प्रा.एस.एस.बर्वे

प्रा.ए.ए.कदम

विद्यार्थी प्रतिनिधी :

कु.योगिता कांबळी

कु.दुर्गेश गावकर

मुखपृष्ठ रचना :

ब्लिंक कम्प्युटर्स,मालवण

अक्षर जुळणी व अंतर्गत मांडणी :

मयेकर्स वेब सोल्युशन्स मुद्रक

मुद्रक :

मयेकर्स वेब सोल्युशन्स

प्रकटन

प्रकाशन स्थळ : स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग.

प्रकाशन कालावधी : वार्षिक

मुद्रक : मयेकर वेब सिरीज

प्रकाशक : प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले
स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग.

संपादक : डॉ. उज्ज्वला सामंत

नियतकालिकाची मालकी व प्रकाशन हक्क : स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग.

मी प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण जाहीर करतो की वर दिलेले निवेदन माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे पूर्णतः खरे आहे

डॉ. श्रीरंग मंडले
प्राचार्य

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग.

टीप : या अंकातील लेखनात व्यक्त झालेल्या मतांशी प्राचार्य संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

आमची स्फूर्तीस्थाने

कै. कृष्णराव सीताराम देसाई

(कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ संस्थेचे आद्य शिल्पकार)

सन 1914 मध्ये वुमन्स एज्युकेशन सोसायटी, मालवण ची स्थापना करून कै.कृ.सी. देसाई यांनी 14/06/1914 रोजी कन्या शाळेची सुरुवात केली. टोपीवाला हायस्कूल, मालवण (स्थापना सन 1911) चे ते आद्य संस्थापक म्हणूनही परिचित आहेत. स्त्री–शिक्षणचळवळी निमित्ताने सन 1918 मध्ये कै. महर्षी अण्णासाहेब कर्वे मालवणमध्ये मा. आबासाहेबांचे म्हणजेच कै. कृ. सी. देसाई यांचे कौतुक करण्यासाठी आले होते. वुमन्स एज्युकेशन सोसायटी, मालवण चे दुसरे अध्यक्ष कै. हायनेस बापूसाहेब सरदेसाई महाराज, सावंतवाडी संस्थान यांनी कै. कृ.सी. देसाई यांना कोकणचे कर्वे असे संबोधून गौरव केला. दि. 05/09/1939 रोजी मा. आबासाहेबांचे निधन झाले. मा. आबासाहेबांच्या कार्याचे स्मरण कायमस्वरूपी राहावे याकरिता वुमन्स एज्युकेशन सोसायटीला कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ असे नाव देण्यात आले

कै.विश्वनाथ अनंत तथा बळवंतराव आजगावकर

(कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ संस्थेचे प्रमुख आधारस्तंभ)

इंग्लंडमधील लीड्स विद्यापीठ येथून "डिप्लोमा इन एज्युकेशन" व "मास्टर ऑफ एज्युकेशन" या मानाच्या पदव्या मा. बळवंतरावानी संपादन केल्या. सन 1939 साली मा. बळवंतराव मायदेशी परतल्यानंतर मुंबईसारख्या ठिकाणी त्यांना सहज नोकरी मिळवता आली असती परंतु स्वतःच्या गावी येऊन शैक्षणिक कार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मा. बळवंतराव यांनी कै. कृ. सी. देसाई यांना गुरू मानले होते. आपल्या याच गुरुंसोबत मा. बळवंतराव यांनी ब-याच प्रमाणात व्यवस्थापनाचे काम सांभाळले. मा. आबासाहेबांच्या पश्चात मा. बळवंतरावानी संस्थेची धुरा सांभाळली. मा. बळवंतरावानी टप्प्याटप्प्याने 1941 साली प्राथमिक सराव पाठशाळा, 1943 साली डी. एड. कॉलेज,1965 साली स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय तसेच 1976 साली रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय सुरू करून मालवण व परिसरातील मुला–मुलींच्या पदवीपर्यंत शिक्षणाची सोय केली. 17 सप्टेंबर 1996 रोजी मा. बळवंतरावांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर 1941 साली स्थापन झालेल्या प्राथमिक कन्याशाळेला त्यांचे नाव देण्यात आले.

कै. रामचंद्र विठ्ठल परुळेकर तथा रामभाऊ परुळेकर

मुंबई येथील एलफिस्टन कॉलेज मधून कै. रामभाऊ परुळेकर 1911 साली एम. ए. झाले. 1912 मध्ये ते टोपीवाला हायस्कूल, मालवण चे मुख्याध्यापक बनले. 1921 मध्ये लंडन विद्यापीठाची टी.डी. व लीड्स विद्यापीठाची एम.ई.डी. या मानाच्या पदव्या मा. रामभाऊंनी संपादन केल्या. 1924 मध्ये मुंबई म्युनिसिपाल्टीच्या स्कूल कमिटीचे ते सेक्रेटरी बनले. मा. रामभाऊ पुण्याच्या टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन प्राध्यापक, कोल्हापूरच्या महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेजचे प्राचार्य तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेचे सेक्रेटरी होते. शिक्षकांच्या वेतन श्रेणीतील बदलांसदर्भात नेमलेल्या घाटे– परुळेकर समितीचे मा. रामभाऊ प्रमुख सल्लागार होते. 'Literacy in India' व 'Mass Education' हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिले. 7 एप्रिल 1984 रोजी कै. रामचंद्र विठ्ठल परुळेकर (रामभाऊ परुळेकर) यांचे नाव कनिष्ठ महाविद्यालयास देण्याचा समारंभ संस्थेचे अध्यक्ष कै. शेठ मोतीराम देसाई–टोपीवाले यांच्या उपस्थितीत पार पडला.

कै. स. का. पाटील

कै. सदाशिव कान्होजी पाटील यांचा जन्म 11 ऑगस्ट 1898 रोजी आंदुर्ले, ता. कुडाळ येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण केळूस, साळगाव, कुडाळ व मालवण येथे झाले. 1937 साली प्रथमच ते मुंबई प्रांतिक विधानसभेत निवडून गेले. 1945 मध्ये मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस व 1956 पर्यंत अध्यक्षस्थान भूषवले. 1941 ते 1951 अशी सलग तीन वर्षे ते महानगरपालिकेत मुंबईचे महापौर म्हणून कार्यरत होते. या बहुरंगी नगरीला प्रति पॅरिस बनविण्याचे त्यांचे स्वप्न होते. म्हणूनच त्यांना 'मुंबईचे अनभिषिक्त सम्राट' म्हणून ओळखले जायचे. 1952,1957 मध्ये दक्षिण मुंबईतून व 1962 मध्ये गुजरातमधून लोकसभेवर निवडून गेले. 1957 ते 1967 पर्यंत सुमारे दहा वर्षे त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळात अन्न, दळणवळण व रेल्वेमंत्री म्हणून काम करीत आपल्या कार्याचा ठसा उमटवला. 24 मे 1981 रोजी त्यांचे निधन झाले. कै. स. का. पाटील यांच्या प्रयत्नाने सिंधुदुर्ग महाविद्यालया स्वतंत्र जागा, इमारत व क्रीडांगण याची सोय करण्याकरिता मुंबईचे दानशूर व्यापारी शेठ विठ्ठलदास हकमचंद यांनी रुपये दोन लाख देणगी दिली. तसेच कै. स. का. पाटील यांच्या मित्रपरिवाराने रुपये एक लाख रक्कम दिली. देणगीदारांनी मा. स. का. पाटील यांचे नाव वरिष्ठ महाविद्यालयास देण्याचा आग्रह धरला. दि. 31/10/1965 रोजी वरिष्ठ महाविद्यालयास स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय असे नाव देण्याचा कार्यक्रम महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या हस्ते पार पडला.

कै. सुलोचन श्रीपाद पाटील

पूर्वाश्रमीच्या कु. काशी परुळेकर या आमच्या कृ. सी. देसाई शिक्षण संस्थेच्या कै. वि. अ.आजगावकर प्राथमिक कन्याशाळेच्या विद्यार्थिनी होत्या. आपली मैत्रीण कै. विमल पाटील यांच्या मदतीने कन्याशाळा मालवण मधील विद्यार्थिनींना शोधून मा. काशी यांनी आपले गुरू कै.वि.अ.आजगावकर यांच्या पंचहत्तरी निमित्त मेळा भरवून आपण एक आदर्श शिष्य आहोत हे सिद्ध केले. शाळेत असल्यापासून त्या राष्ट्रसेवा दलाच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. सामाजिक बांधीलकी जपर्णाया, साधी राहणी व उच्च विचारसरणी हे ब्रीद सांभाळणार्‌या होत्या. सन 1946 मध्ये मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील यांच्याशी कु. काशी यांचा विवाह झाला व विवाहानंतर कु. काशी यांचे सौ. सुलोचना असे नामांतर करण्यात आले. सौ. सुलोचना पाटील यांच्या पंचाहत्तरी निमित्त त्यांचे पती मा. श्रीपाद पाटील यांनी सौ. सुलोचना यांना हिर्‌याची कुडी देऊ केली. तेव्हा त्या म्हणाल्या, या वयात हिर्‌याची कुडी घालून समारंभात मिरवले तर लोक हसतील.तुम्ही ते पैसे पुण्यामधील हिंगणे येथील कै. साहेब कर्वे यांच्या सेवा सदनाला दीपावली भेट म्हणून द्या. त्यानंतर पुण्याला जाऊन ती रक्कम देणगी म्हणून देऊन आले. मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील यांनी सौ. सुलोचना श्रीपाद पाटील कनिष्ठ म्क्व्क महाविद्यालय सुरू करण्यासाठी रु. 15,00,000 आपल्या पत्नीच्या नावे देणगी म्हणून दिले. त्यामुळे कै. सुलोचना श्रीपाद पाटील यांचे नाव कनिष्ठ एम.सी.व्ही.सी. महाविद्यालयात दिले.



देशभक्त
कै. शंकरराव कृष्णाजी गवाणकर

शेतकरी, शिक्षक, वकील, आमदार, व एक सच्चे देशभक्त कै. शंकरराव कृष्णजी गवाणकर यांचा जन्म सन 1880 साली घुमडे, ता. मालवण या गावी झाला. मालवण मध्ये सातवी पर्यंतचे शिक्षण घेवून पुढील शिक्षणासाठी मा. शंकरराव मुंबईला गेले. मुंबई येथे मॅट्रिक झाल्यानंतर इंग्रजी शाळेत शिक्षक म्हणून काम करू लागले. नोकरी करीत, विविध कामे करीत वकिलीचा अभ्यास करून ते वकील बनले व मालवणला परत आले. ही गोष्ट 1925 ते 1930 सालातील आहे. मालवणमध्ये परतल्यानंतर ते वकिली करू लागले. यात काळात गांधीजींचे नेतृत्व पुढे आले. हिंदुस्तानला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी राष्ट्रपिता, महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाचा व असहकाराचा मार्ग देशाला दाखवला.

1932 च्या सत्याग्रहाच्या चळवळीत मा. शंकरराव गवाणकर यांचा संपूर्ण परिवार सामील झाला होता. त्यांची पत्नी शांताबाई, भावजय यमुनाबाई, मुलगा रामचंद्र व पुतण्या गजानन हे पाच जण एकाचवेळी तुरूंगात शिक्षा भोगत होते. मा. शंकराव गवाणकर हे स्वातंर्त्य चळवळीत भाग घेणारे मालवणमधील एकमेव वकील होते.

"मालवणातील सत्याग्रह आंदोलनाचे एक आधारस्तंभ म्हणजे शंकर कृष्णाजी गवाणकर यांच्या सहकार्याने मी मालवणात पहिला सामुदायिक सत्याग्रह करविला". असा आवर्जून उल्लेख मा. कर्मयोगी आप्पा पटवर्धन यांच्या 'माझे जीवन यात्रा' या आत्मचरित्रात मा. शंकरराव गवाणकर यांच्याविषयी आढळतो. 1937 साली झालेल्या निवडणुकीत कॉंग्रेसच्या तिकिटावर मा. शंकरराव गवाणकर आमदार झाले.

मालवण तालुक्याचे कॉंग्रेसचे पहिले आमदार मा. शंकररावानी 1930, 32 व 42 च्या सत्याग्रहात भाग घेतला होता व यादरम्यान एकूण चार वर्षांची शिक्षा भोगलेली आहे. तुरुंगातून सुटल्यानंतर मालवण तालुक्यातील पोईप,विरण या गावी त्यांनी इंग्रजी शाळा सुरु केली. या शाळेचे नाव शमिडल स्कूल पोईपश असे ठेवले. या स्कूलमध्ये मा. शंकरराव गवाणकर, बागवे मास्तर व साटम मास्तर हे तिघेजण शिक्षक म्हणून काम करू लागले. जानेवारी 1948 च्या सुरुवातीला शाळा गावकर्यांच्या ताब्यात देऊन आपल्या गावी म्हणजेच घुमडे येथे परतण्याचा निर्णय मा. शंकरराव यांनी घेतला.

1956 चाली भाषावार प्रांतरचना झाली.बेळगाव व कारवारच्या सीमा भागावर मोठा अन्याय करून हा भाग कर्नाटक मध्ये सामील करून घेतला. बेळगाव व कारवारच्या जनतेने या अन्यायाविरुद्ध सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहाविषयी समजतात मा.शंकरावांच्यातील सत्याग्रही त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. वयाच्या 76 व्या वर्षी शरीर थकलेले असताना मनाने तरुण असणारे मा. शंकरराव बेळगावला गेले व भाई माधवराव बागल यांच्या तुकडीत सहभागी झाले.यादरम्यान त्यांना सहा महिन्याचा कारावास झाला.

जीवन सुखी होण्यासाठी जीवन देवाची पूजा केली पाहिजे. दगडाच्या, मातीच्या, धातूच्या देवांची पूजा करून चालणार नाही असे ते म्हणत असायचे. आपले हे विचार त्यांनी 'सुखाचे साधन भाग–1' व 'सुखाचे साधन भाग–2' या पुस्तिका लिहून समाजासमोर ठेवले. मे 1960 मध्ये वृद्धापकाळाने त्यांचे मालवण येथे निधन झाले.

मा. कै. शंकरराव कृष्णाजी गवाणकर यांच्या कन्या मा.सौ. स्नेहलता बाबुराव ठाकूर या आमच्या कृ.सी. देसाई शिक्षण संस्थेकडील कन्याशाळेच्या विद्यार्थीनी होत्या. 2014 मध्ये झालेल्या कृ.सी.देसाई शिक्षण संस्थेच्या शतकोत्सवास प्रमुख पाहुणे म्हणून मा. किरणजी ठाकूर (संपादक दै. तरुण भारत) आले होते. मा. सौ . स्नेहलता ठाकूर या त्यांच्या आईचे ऋण म्हणून कृ. सी. देसाई शिक्षण संस्थेकडील नव्याने सुरू होणार्या सायन्स कॉलेजसाठी एक कोटी रुपयांची देणगी जाहीर केली. या सायन्स कॉलेजला आपले आजोबा मा. कै. शंकरराव गवाणकर यांचे नाव द्यावे असे मा. किरणजी ठाकूर यांनी यांनी सुचविले.

मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील तथा काका पाटील

मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील यांचा जन्म 1921 साली आंदुर्ले, ता. कुडाळ येथे झाला. मराठी व इंग्लिश हे विषय पदवीसाठी घेऊन ते एल्फिस्टन कॉलेजमधून बी. ए. ऑनर्स उत्तीर्ण झाले. त्यानंतर लगेचच 1946 साली ते कस्टममध्ये इक्झामीनर म्हणून नोकरीस लागले. पुढे नंतर अप्रेईजर, प्रिंसिपल अप्रेईजर व असिस्टंट कलेक्टर पदावर बढत्या मिळाल्या. त्यांनी कस्टममध्ये केलेल्या कामाची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना दोन वेळा "राष्ट्रपती पदक" देऊन गौरविले. 1965 मध्ये त्यांना पहिला राष्ट्रपती पुरस्कार स्व. मोरारजी देसाई, वित्तमंत्री यांच्या हस्ते देण्यात आला. अप्रेईजर खात्यात असा पुरस्कार मिळणारे ते पहिले होते. दुसरा राष्ट्रपती पुरस्कार श्री अग्रवाल, मिनिस्टर ऑफ स्टेट यांच्या हस्ते देण्यात आला. सुमारे 30 वर्षे गौड ब्राह्मण सभेच्या गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे तसेच कुडाळ देशकर युवा या दोन प्रकाशनांचे संपादनाचे काम त्यांनी पाहिले. सामाजिक जीवनात केलेल्या कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार व मानचिन्हे मिळाली आहेत. 1980 मध्ये ते कस्टम मधून निवृत्त झाले. कस्टम मध्ये असताना त्यांनी स्वतरू कधी गैरमार्गाने पैसा मिळवला नाही व आपल्या सहका-यांनासुद्धा तसे करू दिले नाही. आपले संपूर्ण आयुष्य काटकसरीने काढले. आजही 95 व्या वर्षी ते बसने, रेल्वेने प्रवास करतात. मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील यांनी गेल्या दोन वर्षात दिलेल्या प्रमुख देणग्यांची यादी.

अ.क्र.	संस्थेचे नाव	कार्य	देणगीचा उद्देश	रक्कम (रुपये)
1.	मालवण एज्युकेशन सोसायटी, C/o ए. एस. टोपीवाला हायस्कूल, मालवण	शिक्षणकार्य	श्रीमती सुलोचना पाटील मेमोरियल हॉल बांधण्यासाठी	50,00,0000/-
2.	कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ, मालवण	शिक्षणकार्य	श्रीपाद बाळकृष्ण पाटील भवन (कॉलेज इमारत) बांधण्यासाठी	50,00,0000/-

अ.क्र.	संस्थेचे नाव	कार्य	देणगीचा उद्देश	रक्कम (रुपये)
3.	झेप पुनर्वसन केंद्र पुणे	मतिमंद मुलांचे पुनर्वसन कार्य	श्रीमती सुलोचना पाटील यांच्या नावाने 'थेरपी' सेंटर उभारणीसाठी	17,00,000/-
4.	कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंड	निराश्रितांना सहाय्य (ज्ञातीतील)	कायम फंडस देणगी	15,00,000/-
5.	कृ.सी देसाई शिक्षण मंडळ, मालवण	शिक्षणकार्य	श्रीमती सुलोचना पाटील व्यावसायिक (M.C.V.C.)ज्युनि. कॉलेज कक्ष बांधण्यासाठी	15,00,000/-

कृ. सी. देसाई शिक्षण संस्थेची नूतन वास्तू 'श्रीपाद बाळकृष्ण पाटील भवन' चे उद्घाटन 4 फेब्रुवारी, 2017 रोजी झाले. मा. श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील यांनी दिलेल्या मौलिक देणगीमुळे ही वास्तू पूर्णत्वास जाऊ शकली. त्यांच्या या कार्याचे स्मरण कायमस्वरुपी रहावे याकरिता या नूतन वास्तूस त्यांचे नाव देण्यात आले.

कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण जि. सिंधुदुर्ग

कॉलेज विकास समिती

मा. श्री. श्रीपाद शंकर पंतवालावलकर	– अध्यक्ष
मा. श्री. चंद्रशेखर रजनीकांत कुशे	– सचिव
मा. डॉ. राहुल श्रीपाद पंतवालावलकर	– सदस्य
मा. प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले	– सदस्य
मा. प्राचार्य हेमंत प्रभू	– सदस्य
मा. प्रा. श्री. बाबुराव हिंदुराव चौगुले	– सदस्य
मा. डॉ. उज्वला यशवंत सामंत	– सदस्य
मा. प्रा. श्री. नागेश कदम	– सदस्य
मा. प्रा. डॉ. डि. व्हि. हारगिले	– सदस्य
मा. श्री. प्रमोद गोसावी	– सदस्य
मा. श्री. श्रीकृष्ण तांडेल	– सदस्य
मा. श्री. लक्ष्मीकांत रवींद्र खोबरेकर	– सदस्य
मा. श्री. संदेश रामचंद्र कोयंडे	– सदस्य
महाविद्यालय विद्यार्थी प्रतिनिधी	– सदस्य

कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण जि. सिंधुदुर्ग

सीनिअर कॉलेज समिती

मा. श्री. श्रीपाद शंकर पंतवालावलकर	– अध्यक्ष
मा. प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले	– सचिव
मा. श्री. साईनाथ रामचंद्र चव्हाण	– सदस्य
मा. श्री. ॲड. समीर गवाणकर	– सदस्य
मा. श्री. चंद्रशेखर रजनीकांत कुशे	– सदस्य
डॉ. उज्वला यशवंत सामंत	– सदस्य
प्रा. बाबुराव हिंदुराव चौगुले	– सदस्य
डॉ. देवीदास विक्रम हारगिले	– सदस्य
श्री. अनिल दाजी कदम	– सदस्य

K.S.D.S. Mandal's
S.K.Patil Sindhudurg Mahavidyalaya

NON – TEACHING STAFF

- Smt. M. N. Tendolkar - Off. Supdt.
- Shri. P. L. Gosavi - Head Clerk
- Shri. A. D. Kadam - Sr. Clerk
- Shri. K. T. Salunke - Jr. Clerk
- Smt. S. S. Belekar - Jr. Clerk
- Shri. A. M. Kandalgaonkar - Peon
- Shri. S. D. Kadam - Peon
- Shri. S. N. Atak - Peon
- Shri. D. Y. Pawar - Peon
- Sri. R. I. Soz - Peon
- Shri. R. V. Birmole - Lib. Atten.
- Shri. Y. N. Rane - Lab. Atten. (N/G)

कृ. सी. देसाई शिक्षण मंडळ

स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण जि. सिंधुदुर्ग

रामभाऊ परुळेकर कनिष्ठ महाविद्यालय शालेय समिती

मा. श्री. साईनाथ रामचंद्र चव्हाण

मा. प्राचार्य डॉ. श्रीरंग बापूराव मंडले

मा. श्री. चंद्रशेखर रजनिकांत कुशे

मा. श्री. शैलेश दत्तात्रय सामंत

मा. श्री. ॲड. समीर सुरेश गवाणकर

मा. श्री. प्रमोद लक्ष्मण गोसावी

मा. प्रा. सौ. स्नेहा चंद्रशेखर बर्वे

मा. प्रा. श्री. हसन युसुफ खान

सन्माननीय पदाधिकारी

मा. श्री. किरण बाबुराव ठाकूर अध्यक्ष	अध्यक्ष
मा. श्री. श्रीपाद शंकर पंतवालावलकर	चेअरमन / कार्याध्यक्ष
मा. श्री. चंद्रशेखर कुशे	सहचिटणीस

प्राचार्यांचे मनोगत

Covid-19 च्या अस्थिर परिस्थितीत महाविद्यालयाचा Online अस्मिता अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. जगात,देशात ,महाराष्ट्रात आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये Covid मुळे एक वेगळी परीस्थिती निर्माण झालेली आहे. मानवी जीवन एक अनिश्चितेच्या टप्प्यावर पोहचलेले आहे. पण परिस्थिती निश्चितपणे बदलत असते.

केंद्रसरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण –2019 जाहिर झाले. देशाला केंद्रस्थानी मानून शिक्षण प्रणालीतून उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करत राष्ट्राला न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजात परवर्तित करण्यात शिक्षण क्षेत्र योगदान देईल. शिक्षण हे विद्यार्थ्यांसोबत घडणा–या आंतरक्रियेतून घडते. ही आंतरक्रिया जेवढया उत्कृष्ट पध्दतीले केली जाईल. तेवढे चांगले शिक्षण मिळेल.

महाविद्यालयात वर्षभर सामाजिक उपक्रम, शैक्षणिक उपक्रम घेतले जातात. सदर उपक्रम सचित्र स्वरुपात अहवालात दिलेले आहे. विद्यार्थ्यांना सामाजिक भान, राष्ट्रप्रेम, उद्योग व्यवसाय, स्वयंरोजगार, व्यक्तिमत्व विकास पर्यावरण, निसर्गसंवर्धन स्वच्छता आरोग्य, स्वसंरक्षण, विचारभाव अभिव्यक्ति स्वातंत्र्य जोपासण्यासाठी विकसित करण्यासाठी त्या–त्या विभागाव्दारे विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्यासाठी स्पर्धा मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करुन दिलेले आहे. ग्रंथालयात त्यासाठी स्वतंत्र विभाग तयार केलेला आहे. विविध क्षेत्रात अलौकिक कार्य करणा–या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातर्फे यथोचित गौरव केला जातो.

महाविद्यालययातील प्राध्यापकांनी यूजीसी मान्यताप्राप्त जर्नल्समध्ये आपले शोध निबंध प्रकाशित केलेले आहेत . तसेच विविध स्तरावरील परीषदा चर्चासत्रे व कार्यशाळांमध्ये शोध निबंध सादर केलेले आहेत. सामाजिक बांधिलकी जपने हे महाविद्यालयाचे ध्येय आहे. स्वच्छता, बेटी बचाओ, बेटी पढाओ ,व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, रक्तदान महिलासुरक्षा, वुक्षारोपण, रस्तासुरक्षा, जनजागृती इत्यादी उपक्रम एन.एस.एस., एन.सी.सी. विभागांमार्फत राबवून विद्यार्थ्यामध्ये सामाजिक भान ,मूल्यशिक्षण रुजविण्याचा प्रयत्न केला जातो.

'विद्यार्थ्याचे हीत हेच आमचे हित' या संकल्पपूर्तीसाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील आहे. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीसाठी आमच्या कृ. सी. देसाई शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व सर्व सन्माननीय पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, महाविद्यालय विकास समिती, शालेय समिती यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे. महाविद्यालयाचे माझे सर्व प्राध्यापक वुंद कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयाने यशस्वीतेचा पल्ला गाठलेला आहे.

विद्यार्थ्यांना जे बनायचं आहे ते बनण्याची जिथे जायचे आहे तिथे जाण्याची, महान/मोठी उदिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणारी प्रचंड शक्ती / उर्जा तुमच्या मध्ये आहे. त्यासाठी निश्चित केलेल्या दिशेने व दृष्टीने दिर्घकालीन प्रवास करणे महत्वाचे आहे. या प्रवासातील आनंद आपल्याला मोठे आत्मसुख मिळवून देतो. जेव्हा मन आपोआप शोत होत. अशा आंतरीक शांततेतून मोठया सृजनशिलतेकडे आपल्याला जाता येईल.

अत्यंत प्रभावी परिणामकारक व्यक्तींच्या सात चांगल्या सवयी विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्या तर...

- आपले प्रत्येक पाऊल मी जबाबदार आहे, या विचाराने टाका. एकूणच बांधिलकी सह स्वीकारलेली संपूर्ण जबाबदारी आणि अनासक्त कष्टप्रदतता तुम्हांला नेहमीच कार्यरत ठेवेल.
- उदिष्ट व ध्येय निश्चित करुन प्रवासाला आताच प्रारंभ करा.
- प्राधान्याने करावयाच्या महत्वाच्या गोष्टी, वेळीच ओळखा आणि कृतीशील रहा. तुमची स्वच्छ, स्पष्ट विचारसरणी तुमचा समजूतदारपणा हा फार महत्वाचा असतो. संयम व सौम्यता यांना जवळ करा.
- विजेत्याची मानसिकता आणि विजयासाठीचे सर्वोत्कृठ प्रयत्न आणि आपला सदभाव यांचा समन्वय साधा.
- जीवनाला कार्याला व्यस्थेला सर्व बाजूंनी व सम्रग्रपणे समजून घ्या. घटकांचे परस्पर संबंध ओळखा. शिवाय प्रत्येक घटकांचे महत्व ओळखा स्वतःची जबाबदारी ओळखा. संपूर्ण प्रतिसाद द्या!
- प्रत्येकामध्ये प्रचंड उर्जा व चैतन्य आहे. त्यासाठी संवाद समजूतदारपणा बाळगा. आपण स्वीकारलेल्या कार्याशी बांधिल रहा.!

- स्वतःला अंतर्मुखपणे सतत पारखत रहा. कालच्यापेक्षा आज दोन पावलांनी पुढे जा. शिवाय स्वतःशीच स्पर्धा करा.

अपयशातुन खूप काही शिकण्यासारखे आहे. अपयश हा पराभव नसतो. त्यासाठी महान/मोठी स्वप्ने पहा आणि त्या स्वप्नाचा कष्टपूर्वक पाठलाग करत जीवनाला आकार द्या. तुमची स्वप्नशृष्टी ही तुमच्या वास्तवाचेच एक पूर्वरूप असेल. तुमचे आदर्श हेच तुम्हाला संस्कारीत करीत असतात. घडवत असतात.
यशस्वी होण्यासाठी अंतर्मुखपणे स्वतःला चार प्रश्न विचारा!

का?

का नाही?

मी का नाही?

आजच का नाही?

प्राचार्य डॉ. श्रीरंग मंडले

मराठी
विभाग

अनुक्रमणिका

- ❖ दैनंदिन जीवनात ऊर्जाबचतीसाठी कराचयाचे उपाय - रत्नप्रभा प्रमोद आढाव
- ❖ **मोबाईलचे दुष्परिणाम** - **वैभवी दिपक गांवकर**
- ❖ अशी ही मैत्री? - हर्षाली बाली चव्हाण
- ❖ 'शिवबा' - प्रा. बी. एच्. चौगुले
- ❖ हे भारता - प्रा. बी. एच्. चौगुले
- ❖ बाप - गौरी विजय मुंबरकर
- ❖ मैत्री म्हणजे
- ❖ प्रवास गोल्ड मेडल पर्यंतचा..... - ऋतू संजय गोवेकर
- ❖ दशावतार - प्रथमेश रश्मी रत्नाकार सामंत
- ❖ आयुष्य - ईलीना लोबो
- ❖ मिस कॉलचं गुपित - वेलिंडा लुद्रिक
- ❖ सिलॅबस - वेलिंडा लुद्रिक
- ❖ आमचो मालवणी माणूस... - वेलिंडा लुद्रिक
- ❖ परत एकदा भेटूया ना यार..... - गौरी विजय मुंबरकर

BACK TO SCHOOL

- ❖ स्त्री सक्षमीकरण काळाची गरज - रसिका लाडू मेस्त्री
- ❖ शब्दकोडी - रत्नप्रभा प्रमोद आढाव
- ❖ खरा देव कोण ? - कौस्तुभ सुदर्शन नाईक

दैनंदिन जीवनात ऊर्जाबचतीसाठी कराचयाचे उपाय

1. गरज असेल तेव्हा विदयुत उपकरणे आणि दिवे बंद करणे.

2. वापरात नसताना विदयुत उपकरणांचे मेन स्विच बंद ठेवणे उदा. टि.व्ही.,संगणक इत्यादी यामुळे 15% ऊर्जा बचत होईल.

3. कार्यालयात व घरात सूर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा.

4. सकाळी 7 ते 11 व सायंकाळी 6 ते 10 या वीजेच्या अतिउच्च मागणी काळात मोठया वीज उपकरणांचा वापर टाळावा.

5. वातानुकुलित यंत्र (AC) हे पंख्यापेक्षा 15 पट जास्त उर्जा खर्च करते व वॉटर कुलरपेक्षा 7 पट जास्त खर्च करते म्हणून AC चे तापमान 25% अंश ऐवढे ठेवावे.

6. LED बल्ब, टयुबचा वापर करावा. यामुळे 80% ऊर्जा बचत होईल.

7. Four Strok गाडयांचा वापर टाळावा.

8. कमी अंतरासाठी वाहनांचा वापर टाळावा.

9. पहिल्या व दुसऱ्या मजल्यासाठी लिफ्टचा वापर टाळावा.

10. DEE Star Cable / ISI प्रमाणित उपकरणांचा वापर करावा. त्यांची नियमित देखभाल करावी.

11. सौर, पवन, बायोगॅस, बायोमास यासारख्या अपारंपारिक ऊर्जेवर आधारित साधनांचा वापर करावा.

12. ऊर्जा कार्यक्षमतेच्या निकषावर आधारित नविन इमारती, रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा यांची उभारणी करणे.

13. शासकिय, निमशासकीय क्षेत्रात ऊर्जा वापर उपकरणांची खरेदी करताना ऊर्जा कार्यक्षमतेचे निकष विचारात घेणे आवश्यक आहे.

14. प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या घरात शक्य तेवढी सौर ऊर्जा निर्मिती करावी. अशाप्रकारे सौर ऊर्जा तयार करणे हेच आज खरे देशकार्य ठरणार आहे.

रत्नप्रभा प्रमोद आढाव

11 वी कला

मोबाईलचे दुष्परिणाम

हा सध्याचा प्रत्येक व्यक्तीचा एक जीवलग सखा असल्यासारखा आहे. मोबाईलमुळे आपल्या संपूर्ण पिढीला एका वेगळया दिशेने नेले आहे. वास्तविक मोबाईल हे एक असे अष्टपैलू उपकरण आहे, ज्याच्यामुळे आपली अधिक चांगल्या प्रकारे प्रगती झाली असती; परंतु दुर्दैवाने समाजातील जवळजवळ 70% पुरूष व स्त्रिया, मुले - मुली हे मोबाईलच्या अतिवापराचे बळी पडत आहेत. मोबाईलच्या वेडामुळे, अतिवापरामुळे मोबाईलची कार्यक्षमता काम इच्छा कमी झाली आहे. याचा परिणाम एकूण समाजाला व पर्यायाने आपल्या देशाच्या प्रगतीवर होत आहे.

सध्या आपल्या समाजामध्ये मोबाईलमुळे आपली संपूर्ण युवा पिढी एकायानक दिशेकडे जाताना दिसत आहे. दिवसातील २४ तासापैकी जवळजवळ १२-१४ तास मुले मोबाईलशी खेळताना दिसत आहेत. मोबाईलमध्ये वेगवेगळी ॲप्स तसेच यामधील विविध गेम्समुळे समाजाचे स्वास्थ्य बिघडले आहे, असे आपल्याला दिसून येते. पब्जीसारख्या गेममुळे मुले आपले संतुलन हरवून बसली आहेत. ती खऱ्या जगातून एका आभासी जगाकडे जात आहेत. त्यामुळे हे संकट अतिशय गडद झालेले दिसून येत आहे.

अगदी प्रत्येक घराघरामध्ये अगदी ६ महिन्याच्या मुलापासून सर्वजण मोबाईलच्या इतक्या आहारी गेले आहेत, त्यामुळे फार कमी वयात मुलांना शारिरीक, मानसिक व्याधीना सामोरे जावे लागत आहे. आपण सर्वानी मिळून या मोबाईलरूपी राक्षसाला आवरले नाही तर एक दिवस आपली संपूर्ण पिढी बरबाद झालेली दिसून येईल.

सध्या घरामध्ये प्रत्येक व्यक्तीकडे अँड्रॉइड प्रकारचा मोबाईल आहे. त्यामुळे हे मोबाईल मुले वापरत असतात. हे मोबाईल त्याच्याकडून काढून घेतल्यास त्याची चिडचीड वाढते, ते आक्रमक बनतात, ते आदळआपट करतात हे सर्व टाळण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

सध्या मोबाईलचा लहान मुलांच्या प्रगतीमध्ये कसा अडथळा बनत आहे व त्याच्या शारीरिक तसेच मानसिक स्वास्थ्यावर कसा वाईट परिणाम होत आहे, हे आपण पाहुया.

१. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांचा अभ्यास करण्याचा वेळ कमी झाल्याने शैक्षणिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम दिसून येतो.

२. मोबाईल हा विदयुत चुंबकीय तरंगावर कार्य करतो. सर्व सिग्नल्स हे विदयुत चुंबकीय तरंगाच्या साहाय्याने प्रसारित होतात व या तरंगाचा मेंदूवर थेट परिणाम होतो, त्यामुळे लहान मुले जेवढा जास्त वापरतील तितका धोका वाढतो.

३. मोबाईलमधून बाहेर पडणाऱ्या किरणामुळे मुलांच्या डोळयांवर विपरित परिणाम होतो. डोळयातील पाणी कमी होऊन डोळे कोरडे पडू लागतात.

४. अनेक लहान मुलांना कमी वयात जास्त नंबरचा चष्मा लावलेला पाहायला मिळतो.

५. मोबाईलमधील गेम्समुळे मुले प्रमाणापेक्षा जास्त आक्रमक बनली आहेत.

६. या गेममधील खून, मारामारी, रक्त सांडणे या गोष्टी त्यांना किरकोळ वाटू लागतात. हे समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने निश्चितच हानीकारक आहे.

७. अनेक तास मोबाईल खेळल्यामुळे डोळयाचे विविध आजार मुलांना होत आहेत.

८. मोबाईलवर सतत विशिष्ट बोटाचा वापर केल्यामुळे अनेकांना हाडाशी संबंधीत व्याधी लहान वयात होत आहेत.

९. मुले शाळेत असली तरी अभ्यासापेक्षा ते मोबाईल व त्याच्या गेमच्या दुनियेत मश्गुल असतात.

१०. मोबाईलमुळे मुले क्रीडांगणावर खेळणे कमी झाले आहे, त्यामुळे मुलांच्या स्वास्थ्याचा, फिटनेसचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

११. मोबाईल खेळताना मुले बराच वेळ एकाच जागी बसतात. तेथेच काहीतरी चटपटीत जंकफूड खातात त्यामुळे स्थूलतेचे प्रमाण म्हणजे ओबेसीटी मोठया प्रमाणात वाढली आहे.

१२. मुलांना मित्र राहिले नाहीत, सर्वजण मोबाईलमध्ये मश्गुल असल्याने मैत्रीचे अर्थ बदलल्याचे दिसून येते.

१३. मुलांकडून मोबाईल काढून घ्यायचा प्रयत्न केल्यास ते पालकांना भिती दाखवून ब्लॅकमेल करून टाकतात.

१४. मोबाईलमुळे मुलांचा, पालकांचा एकमेकांशी असणारा संवाद कमी झाला आहे.

१५. मुले वास्तवापेक्षा कृत्रिम जगात जास्त वावरू लागतात.

१६. मुलांचा अभ्यास करण्याचा वेळ मोबाईलवर खर्च

झाल्याने त्याचा अभ्यासावर व शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो.

१७. मोबाईलमुळे मुलांना अनेक मानसिक आजार होत आहेत.

१८. मुलांचे अभ्यासावरील लक्ष कमी होऊन शैक्षणिक प्रगतीत बाधा निर्माण झाली आहे.

१९. मोबाईलमधील नको त्या साईटस, ॲपवरून, कमी वयात नको त्या गोष्टी चुकीच्या पध्दतीने मुलांपर्यत पाहोचतात.

२०. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चिडचिड वाढणे, भीती वाटणे, धडधड वाढणे, अशा मानसिक आजाराचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

२१. जी मुले मोबाईल वापरत नाहीत त्याची शैक्षणिक प्रगती चांगली झालेली दिसून येते. तसेच ते मैदानी खेळ खेळताना दिसून येतात.

वरील सर्व गोष्टीचा गांभीर्यपूर्वक विचार केल्यावर आपल्याला हे लक्षात आले आहे, की सुरूवातीस पालकच आवडीने मोबाईल मुलास देतात; परंतु त्यामुळेच मुलांना त्याचे व्यसन जडते व यास पालकच जबाबदार ठरतात त्यामुळे आपल्या पाल्याच्या उत्कर्षासाठी सर्वांनी मोबाईलचा कमीत कमी वापर केला पाहिजे. असे केले तरच मुलांचे भवितव्य घडेल. याचा सर्व पालकांनी गांभीर्याने विचार करावा. ही थोडीशी अवघड वाटणारी गोष्ट करण्यासाठी पालकांनी स्वतःवर देखील बंधने घालून मुलांना आदर्श निर्माण करून दाखवावा. म्हणजेच निश्चितच सकारात्मक बदल घडून येण्यास निश्चित मदत होईल.

वैभवी दिपक गांवकर

अशी ही मैत्री?

मैत्री वर बोलू तेवढ कमी,
पण मी अनुभवली ती कॉलेज जीवनात,
अगोदर ती फक्त माहीत होती,
थोडीफार जवळची पण होती,
कधी कधी ती जवळची वाटायची,
पण आपलंस करून दूर जायची.

या काही दिवसांत माझ्या ती खूप जवळची वाटली,
'मैत्री' या शब्दाचा खरा अर्थ शिकवून गेली,
ही मैत्री कॉलेजच्या परिसरात असायची,
नाहीतर लेक्चर चुकवून कॅन्टीनमध्ये बसायची,
तर कधी कारण काढून कॉलेजच्या बाहेर फिरायची.

तसा या मैत्रीत काम करायचा जोशच वेगळा असायचा, पण काम कमी व्हायचं आणि बडबडणं जास्त व्हायचं मैत्रीत सगळे भेटले ते अवली कलाकारच होतो, काही चिडके,
काही रडके तर काही मंद असल्यासारखे
पण कला क्षेत्रात कुठे ही मागे नव्हते.

कधी ते चांगले नाटय कलाकार होते आणि गोल्ड मारत, तर कधी उत्कृष्ठ कवी व गायक होवून
ट्रॉफी मारत, वाजवता येत नसलं तरी
सामान जवळ... करून चांगले वादक होते.
उत्साह वाढला आणि घोडयाचा रंग चढला,
की ते उत्कृष्ट डान्सर पण होते,
पण कुठेही नाव ठेवायला जागाच ठेवत नव्हते,
काही खटकलं तर शिव्या दयायला मागे बघत नव्हते.

सर्व आनंदाचे क्षण तो कॅमेरात कैद करायचा,
फोटोत जरी नसला तरी
सगळयांमध्ये उजळून दिसायचा,
कला क्षेत्राशी एवढा लळा लागलेला होता,
की खिशात पैसे नसले तरी, सामान आणून करून दाखवायची, धमक, जिद्द त्यांच्यात होती.
ऐकदा तर मैत्रीची लाट एवढी उसळली की,
पूर्ण रात्र झोपलीच नाही.
काव्य, गायन, नृत्य, अभिनय, मिमिक्री
यांच्यात गुंतुन, गुंग होवून काम करत राहीली.

याच मैत्रीनं शिकवलं मज्जा कशी करायची,
एकत्रीत मिळून धुमशान, कळी, लफडी कशी करायची,
मोबाईल फोडले, ओरडा पण तेवढाच खाल्ला,
घरातून पण आणि कॉलेजमधून सुध्दा,
पण मैत्री तोडण्याचा विचार मनात कधीच नाही आला.

श्रावणात जश्या झाडांच्या फांदया बहराव्या,
तशी ही मैत्री बहरत गेली, सप्तरंगांनी रंगून गेली,
तर कधी कुटुंबांप्रमाणे साथ देत राहिली.
"गो चेडवा" ची झुळूक कानावर आली, की
"बोल डॅड असा नसता" या शब्दांची,
सवय होवून गेली,
पण त्या चेडू आणि डॅड मधली गोडी वेगळी होती,
त्यात काका आणि पुतणीची मारामारी मेन ठरली.

या सगळयात कॉलेज डे मध्ये तर
वेगळीच मजा असायची,
सगळयांना एकत्र येवून काम करायला भाग पाडायची,

आता ही मैत्री सगळीकडे ओळखली जात होती,
कॉलेजच्या कोपऱ्यानं कोपऱ्यात जागा करत होती.

वेळ जात नसला की सोंगं उभी रटायची,
आणि इशारो इशारो मे वेडं करून टाकायची,
या सुंदर अविस्मरणीय वाताराणात एक,
गोड फुलपाखरू भिरभिरायचं,
त्या फुलपाखरा मागे धावताच ते उडून जायचं.

फिरताना तर कोणाचाच हात धरू शकत नव्हती,
"येतो रस्त्यात आहे" सांगुन ठसन दयायची,
तर कधी गाडीवरती स्टंट करून ज्पाज्वा वर व्हायरल, करून घरात मार खायचो.
मग भूक लागली की एकाच डब्यात ताव मारायचो,
नाहीतर बेटाकडे खातं खोललेल होतं.

माझ्या मैत्रीत सगळे भेटेले ते अवली होते,
पण कट्टर शिव भक्त होते, शंकराचे सर्व शौक व अवतार आत्मसाद करायचे. तर काही वाद झाले की थोडे शांत व्हायचे, तर काही रडायचे,
पण अश्रु पुसायला सर्वच तयार असायचे.

आकाशातील सप्तऋषी पाहता पाहता,
सर्व आकाश ताऱ्यांनी भरून गेलं,
थोडी खटयाळ, अल्लड होती, पण बहुरंगानी रंगुन एका वेगळयाच उंचीवर जायची, तुमची आणि आमची काय हो, मैत्री ही मैत्री होती,
माझ्या मैत्रीची गजलच काय और होती,
अशी ही मैत्री?

हर्षाली बाली चव्हाण
S.Y.B.Com

'शिवबा'

'माणूस' एक प्राणी
जंगलात गुहेत राहणारा
रानटी श्वापदासारखा
इकडून तिकडे उडया मारणारा
माकड चेष्टा करणारा
नव्हे, माकडाचाच वंशज!

आज माणूस – शिकला सवरला
लई मोठ्ठा – शहाणा झाला
कपडे घालू लागला
फ्लॅटमध्ये राहू लागला
चंद्रावर गेला
माणसासारखा माणूस त्यानं तयार केला!

पण.....
आज त्यो लईच शहाणा झालाय
आपली जात – कुळी विसरलाय
माणूसपण विसरलाय
निव्वळ 'प्राणी' बनलाय
क्षणोक्षणी 'सावज' शोधतोय
कित्येक 'निर्भया'चा बळी घेतोय

आज.....
आज नको आहे काँग्रेस आन् बीजेपीचं सरकार
आम्हाला हवंय 'शिवबाचं सरकार'
शिवबा येरे
आन्, दाखव तुझा मराठमोळा हिसका
कडयावरनं ढकलून दे या नराधमांना
हात – पाय तोड या नराधमांचे

आन् निक्षून सांग
पुन्हा या भूमीत
नीच, नालायक, रांध्याच्या पाटलाचा अवतार
जन्माला येणार नाही
कधीच नाही–––
कधीच नाही–––

प्रा. बी. एच्. चौगुले

हे भारता

हे भारता,
प्राचीन तुझा वारसा
महान तुझी संस्कृती
महान लोकशाही
अन् परंपरा

तुझेच चंद्रगुप्त, समुद्रगुप्त अन् विक्रमादित्य
बुद्ध, अशोक अन् महावीरही तूझेच
तूझेच गांधी, नेहरू अन् सुभाषबाबू
जिजाऊ, सावित्री अन् आहे त्याही तुझीच

पण आज– – –
काळा पैसा
भ्रष्टाचार
दारिद्रय
बेरोजगारी
कुपोषण
आत्महत्या
स्त्रीभ्रूणहत्या
बलात्कार
ही सारी तुझीच अपत्ये.

म्हणून 'म्हणतो,
गाडून टाक' हया सगळयांना या मातीत कायमची
पुन्हा या मातीत हे नापिक पीक नको आहे
नको त्यांना खत – पाणी
नको त्यांना सप्लीमेंटस्
नको त्यांना निवारा,आसरा
अन् थारा.!

प्रा. बी. एच्. चौगुले

बाप

आईचं गुणगान खूप झाले
पण बिचाऱ्या बापाने काय केले
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फकत गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रूंचे पाट
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही
देवकी – यशोदेचं प्रेम मनात साठवा
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेव ही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करून मुलास देतो पॉकेटमनी
आपण मात्र वापरी शर्ट पॅट जूनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा
त्यांनी समजून घ्यावं ही माझी ईच्छा

गौरी विजय मुंबरकर
अकरावी कला

मैत्री म्हणजे

मैत्री म्हणजे उधान आलेल्या
समुद्राच्या बेधुंद लहरी लाटा....
मैत्री म्हणजे वय, जात, धर्म, भाषा
झुगारून जोडलेल्या असंख्य लाटा....
मैत्री म्हणजे शब्दात न मांडणारं
सर्व नात्यांपलीकडचं नातं....
मैत्री म्हणजे सर्व नात्यांना
मनातून समानतेनं जोडत जात....
मैत्री म्हणजे कॉलेज कट्टयावरची
टिंगल टवाळकी आणि कैफियत....
मैत्री म्हणजे माणुसकीचं झाड उगवण्यासाठी
टाकलेलं प्रेमाचं हळवं खत....
मैत्री म्हणजे सुख दुःख मध्ये ही
समोरच्याला साथ देणं....
मैत्री म्हणजे प्रत्येक वेळी
समोरच्याच हात होणं....
मैत्री म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्याचा
नसतो नुसता दोन शब्दांचा खेळ....
मैत्री म्हणजे प्रत्येक क्षणात
सुख दुःखात साथ द्यायची असते
ती वेळ.....

प्रवास गोल्ड मेडल पर्यंतचा.....

15 सप्टेंबर 2019 हा दिवस कॉलेजच्या प्रत्येक विदयार्थी आणि शिक्षक तसेच समस्थ मालवण वासीयांच्या कायम लक्षात राहिल असा आहे. कारण कॉलेजच्या आतापर्यंतच्या इतिहासात असे एकदाही घडले नव्हते. ते 2019 – 2020 च्या कालखंडात घडवून दाखवले होते. जे एवढया वर्षात घडले नाही. ते आता कसे घडेल असे कोणालाही वाटले नव्हते खरा गोल्ड मेडलचा प्रवास जुलै महिन्यापासून झाला होता. या दिवशी युवा महोत्सावाची सुचना मिळाली.

2 ऑगस्ट 2019 कणकवली कॉलेज कणकवली येथे पार पडलेल्या 52 व्या युवा महोत्सावात आमच्या कॉलेजचे एकूण 22 इव्हेंट मध्ये भाग घेतला होता. त्यापैकी 6 इव्हेंट मध्ये यश प्राप्त झाले. आणि त्या मधील एक होती. ती आमच्या कॉलेजची "निर्वासित" एकांकीका यातील कलाकार माझी जिवलग मैत्रीण जान्हवी बीरमोळे (प्रतिमा हसोळकर) मुख्य स्त्री अभिनय, वैभव वळंजू (संतोष हसोळकर) मुख्य पुरूष अभिनय, ललित चव्हाण (मयुर हसोळकर) मुलगा, स्नेहल चव्हाण (दर्शना हसोळकर) मुलगी, प्रथमेश सामंत (कांबळे) शेजारी हे सर्व कलाकार आणि त्यांना योग्य दिशा दाखवणारे दिग्दर्शक म्हणजे श्री. गणेश गावकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या सर्वांची जबाबदारी घेणारे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. शंकर खोबरे या सर्वांचे कष्ट रात्र – दिवस चालू होते व यामुळेच यश प्राप्त करण्यास बळ आले.

एकांकीका करत असताना अनेक अडचणी आल्या. प्रथम पात्र निश्चित होत नव्हती आणि एकांकीकेची प्रॅक्टीस सुरू झाल्या नंतर एकांकीका सादर करण्यासाठी काहीच दिवस शिल्लक राहिले असताना समजले. 12 वी नंतर गॅप असणाऱ्या विद्यार्थ्यांना यात सहभागी होता येणार नाही. हा नवीन नियम ऐकून सर्वांना धक्काच बसला कारण एकांकीका तशी पूर्णतः बसली होती. त्यामुळे पहिल्या पासून सर्व बदल घडवावे लागले. त्यात एका

मुलीला अचानक आजारी पडल्यामुळे तेही पात्र बदलावे लागले. परत पहिल्या पासून सर्व काही बदलावे लागले. त्यामुळे जास्त मेहनत घ्यावी लागली. पण सरांचे सहकार्य आणि मोलाचे मार्गदर्शन यामुळे हे सर्व काही शक्य झाले. अशाप्रकारे कणकवली कॉलेज कणकवली येथे जिंकण्यात यश आले. पण खरी कसोटी होती. ती पुढील प्रवासाची...

मुंबई विदयापीठ येथे फायनल करिता पोहोचणे म्हणजे खूप कठीण. संपूर्ण मुंबई विदयापीठ संलग्न असलेल्या 93 महाविदयालयांनी एकांकीका या प्रकारात प्राथमिक पात्रता फेरित सहभाग घेतला होता. त्यातून फक्त 23 टीम मुंबई येथील फायनलकरिता निवडल्या गेल्या होत्या. 14 व 15 सप्टेंबर अशी तारीख ठरली. पण येथून जाताना असंख्य प्रश्न उत्पन्न झाले.जायचे कसे? राहायचे कुठे? जबाबदारी कोणी घ्यायची? खर्च किती येणार? सेट कसा नेयचा? यांसारखे असंख्य प्रश्न होते. पण या सर्वांवर मात करून विद्यार्थ्यांनी जायचा निर्णय घेतला. 11 सप्टेंबर 2019 रोजी मालवण येथून रवाना झाले. ही अंतिम फेरी मुंबई येथील आर. डी. नॅशनल कॉलेज, बांद्रा याठिकाणी पार पडली. लिस्टमध्ये मुंबई येथील सर्व नावाजलेल्या कॉलेजची नावे पाहून सर्व घाबरले होते. एकांकीका सकाळच्या सत्रात पार पडली. आणि संध्याकाळ झाली. निकाल जाहीर होण्याची वेळ आली. सर्वत्र एकच शांतता पसरली सर्व कॉलेज विद्यार्थी थेटर मध्ये जमा झाले. प्रथम वैयक्तिक विभागाचे निकाल सुरू झाले. हृदयाची धडधड वाढत होती. ज्या वेळेस एकांकीका या प्रकारची बक्षीसे देण्यास सुरूवात केली. आणि शेवटचे गोल्ड मेडलचे नाव होते Slot No.9 "निर्वासित" स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविदयालय, मालवण पुकारले गेले.....

जर तुमचे कष्ट, मेहनत, चिकाटी आणि स्वतःवर विश्वास असेल आणि तुमच्या कलेबद्दल आदर 100% असेल ना तर यश हे नक्कीच तुमचे असते. अशाप्रकारे झालेला हा प्रवास खरंच सुवर्ण अक्षरात लिहिण्यासारखा आहे....

ऋतू संजय गोवेकर
T.Y.B.Com

दशावतार

दशावतार हा कोकणातील एक लोककला प्रकार म्हणून पाहिला जातो. अगदी प्राचीन कालखंडापासून आजपर्यंत या दशावताराला लोकमानसात एक मानाचे स्थान आहे. भडक रंगभूषा आणि टिपेचा आवाज ही दशावताराची ओळख. या लेखाच्या माध्यमातून मी मला समजलेला दशावतार तुमच्यासमोर मांडण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

कोणत्याही गोष्टीच्या अगदी मुळाशी जायचं असेल तर त्या गोष्टीची सुरूवात कुठून झाली अर्थात त्या गोष्टीची उत्पत्ती कुठून झाली हे पाहिलं जातं. त्याचप्रमाणे दशावताराची उत्पत्ती कुठून झाली याचा अभ्यास करत असताना मला असे समजले की दशावताराची उत्पत्ती नेमकी कधी झाली याबाबत ठामपणे कोणीही सांगू शकत नाही. पण काही प्राचीन साहित्य अभ्यासल्यावर माझ्या असे लक्षात आले की, समर्थ रामदासांच्या काही श्लोकांमध्ये "दशावतारी खेळ" या कला प्रकाराचे वर्णन केलेले दिसते. यावरूनच दशावतार ही कलाप्रकार अगदी समर्थ रामदासांच्या कालखंडापासून अस्तित्वात असल्याचे जाणवते. याबद्दल अधिक माहिती जाणून घेत असताना मी काही तज्ञांची मदत घेतली. तेव्हा मला असे समजले की भरतमुनींनी ज्यावेळी नाटयशास्त्राची निर्मिती केली त्यावेळी पहिले नाटक हे स्वर्गात सादर करण्यात आले. त्याचे नाव होते लक्ष्मी स्वयंवर. या नाटकांमध्ये गंधर्वांनी व अप्सरांनी अभिनय केला होता. या नाटकाच्या सादरीकरणाच्यावेळी अभिनयासोबतच वेशभूषा संगीत व संवाद या घटकांची सुध्दा जोड होती. भरत मुनींचे नाटक लक्ष्मी स्वयंवर वदशावतार यामध्ये बऱ्याच अंशी साम्य असल्याचे दिसून येते.

या कलेचा सिंधुदुर्गात प्रसार करण्याचे काम हे गोरे बंधूनी कर्नाटक मधून सिंधुदुर्गमध्ये येऊन केले. त्यानंतर लोकांमध्ये या कलाप्रकारात आवड निर्माण झाल्यानंतर इतर अनेक दशावतार कंपन्या उदयास येऊ लागल्या. मनोरंजनाचे इतर कोणतेच साधन

उपलब्ध नसल्यामुळे दशावतार या कलाप्रकाराला रसिक प्रेक्षकांची पसंती मिळू लागली. दशावतारातील एक सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कलाकारांची रंगभूषा. दशावतारी कलाकार आपली रंगभूषा स्वतःकरत असतात. एका पेटाऱ्यासमोर बसून एक समोर छोटासा आरसा ठेवून यामध्ये बघून स्वतः स्वतःची रंगभूषा करण्याचे कौशल्य हे दशावतारी कलाकारांमध्ये असते. एखादे पात्र उभे करत असताना त्याबद्दल असलेले वाचन, स्वसंकल्पना व इतिहास यांचा आधार घेऊन ते पात्र रंगवले जाते. सुरूवातीच्या कालखंडात अगदी मातीच्या रंगापासून सुरू झालेली दशावतारी रंगभूषा आज इतर आधुनिक सामग्रीची वापर करून होत असलेली आपल्याला दिसून येते. यानंतर दशावतार ओळखला जातो तो दशावतारातील आवाजाच्या पट्टीसाठी. पूर्वीच्या काळी ध्वनीक्षेपक उपलब्ध नसल्यामुळे आपला अगदी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी दशावतारी कलाकार अगदी टिपेच्या आवाजात आपलेसंवाद सादर करीत असत आणि गीत गाण्यासाठी पांढरी चार ही सर्वात उंच असलेली पट्टी निवडली गेली. कालानुरूप इतर गोष्टींमध्ये बदल होत गेले अगदी ध्वनीक्षेपकही आले परंतु रसिक मायबापाच्या मनात घर करून असलेली पांढरी पट्टी बदलण्याचा निर्णय दशावतार मंडळींनी घेतला नाही.

दशावतारी नाटक सुरू होण्याच्या काही काळ आधी ऐकू येणारी दशावताराची आरती एक वेगळाच आनंद देऊनजाते. याबाबत विचारणा केली असता दशावतारी खेळ रंगवण्याच्या आधी परमेश्वराची आराधना व त्याचे आवाहन करण्यासाठी ही आरती गात असल्याचे दशावतारी कलाकारांकडून मला समजले. पूर्वीच्या काळी हे आवाहन मंत्रपुष्पांजलिच्या सहाय्याने केले जायचे पण जसा काळ बदलला तशी दशावतारात ही आरती रूढ झाली.

पूर्वीच्या काळात मनोरंजनाचे इतर कोणतेही साहित्य उपलब्ध नसल्यामुळे चालणारा दशावतार अगदी आजही मनोरंजनासाठी इतर अनेक सामग्री उपलब्ध असतानाही आपले वेगळेपण आणि अस्तित्व टिकवून असल्याचे दिसून येते. प्रेक्षक वर्ग अधिक मोठया संख्येने दशावताराकडे ओढला जावा यासाठी काही दशावतार कंपन्यांनी ट्रिकसीन हा एकनवीन प्रकार दशावतारात सुरू केला व अपेक्षेप्रमाणे प्रेक्षकांची गर्दी होऊ लागली.

दशावताराकडे मनोरंजनाबरोबरच प्रबोधनाचे माध्यम म्हणूनही पाहिले जाते. विविध दशावतारी नाटकातील कथानकातून हे दशावतारी कलावंत समाज प्रबोधनाचे काम करत असताना दिसून येतात. एखादा पुराणातील प्रसंग घेऊन माणूस जे वागतो त्यात काय चूक काय रोबर हे दशावतारी नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडले जाते. त्यासाठी पुराणातला दाखला सुध्दा दिला जातो.

आजच्या काळातील दशावतारातील विचार केला असता मध्यंतरीच्या काळात जेव्हा दशावतारी कला लोप पावते की काय असं वाटत होतं त्यानंतर आज दशावताराला खूप चांगले दिवस आल्याचे दिसून येतात. ट्रिकसीन दशावतार, संयुक्त दशावतार यामुळे व कलाकारांची आवड यामुळे दशावताराकडे प्रेक्षकांचा कल वाढत असल्याचा दिसून येते आज दशावतारामध्ये युवा पिढीचे कलाकार उतरत असल्यामुळे इतर तरूणांना देखील दशावताराची आवड निर्माण होण्यास मदत होते. तसेच इतर अभ्यासू कलाकार दशावतारी नाटकांमध्ये अभिनय करू लागल्यामुळे पुराणातील अनेक गोष्टींचा उलगडा होण्यास मदत होते. पूर्वीच्या काळी केवळ सिंधुदुर्ग पुरती मर्यादित असणारी कला आजच्या काळात अगदी मुंबई–पुण्यासारख्या शहरांपर्यंत जाऊ लागली आहे आणि हीच या कलेची आणि कलाकारांची यशस्विता आहे.

लहानपणापासून असणारी दशावताराबद्दलची आवड आणि प्रेम यामुळे मला हा लेख लिहिण्याची इच्छा निर्माण झाली. यात मला तज्ञ कलाकार दत्तप्रसाद शेणई आणि सीताराम उर्फ बाबा मयेकर यांची मोलाची मदत झाली. त्यातूनही माझ्या अल्पमतीला जे काही आकलन झालं ते मी लिहिण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. इच्छा ऐवढीच आहे की या दशावताराची उत्तरोत्तर प्रगती होत जाऊन लवकरच अधिक चांगले दिवस दशावताराला यावेत.

धन्यवाद

प्रथमेश रश्मी रत्नाकार सामंत
S.Y.B.A.

आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही,
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकास दिसत नाही...

हरवला तो आपसातला,
जिव्हाळयाचा संवाद,
एकमेकांस दोष देऊन,
नित्य चाले वाद विवाद...

धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही,
हृदयाचे पाऊल कधी,
हृदयाकडे वळत नाही...

इतकं जगुन झालं पण,
जगायला वेळ नाही,
जगतो आहेस कशासाठी,
काहीच कसला वेळ नाही...

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा श्वास
अर्ध्यांवरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोडंतरी जपून घ्या
सुंदर आशा जगायला
डोळे भरून बघून घ्या.

ईलीना लोबो
F.Y.B.A.

मिस कॉलचं गुपित

खूप विचार केला, पण
उत्तर काही सापडेना ।
तुझ्याकडून येणाऱ्या,
मिस कॉलच गुपित काही उघडेना ।।

काम तुझं असुन ही,
मिस कॉल मला करतेस ।
माझा फोन जो वर येईना,
कॉलवर कॉल करतेस ।।
म्हणूनच मला प्रश्न पडलाय,

तु नेहमीच मिस कॉल का करतेस ।
महिन्याला मिळणाऱ्या टॉक टाईमच,
नेमक तु काय करतेस,
असही मला समजलय,
तु सर्वांनाच मिस कॉल करतेस ।।

अस नाही की,
तु खूप गरीब आहेस,
आणि आर्थिकदृष्टया संकटात आहेस ।
म्हणूनच कधीतरी,
कॉल ही करत जा ।।

ऐवढे रूपये देऊन मोबाईल विकत घेतला,
त्याचा पुरेपूर फायदा घेत जा ।
उत्सुकतेने मैत्रीसाठी मी ही,
तुझ्या मिस कॉल ला उत्तर देते ।।

यापुढे आता अस होणार नाही,
फक्त ऐवढेच तुला सांगते ।
तु समजदार आहेस,
या पुढे कॉल करशील ।
टॉक टाईमकडे न बघता,
माणुसकीला जपशील ।।

वेलिंडा लुद्रिक
F.Y.B.A.

सिलॅबस

सिलॅबस जरा जास्तच आहे
दरवर्षी...
चॅप्टर्स पाहून पासिंगचा
प्रॉब्लेम मनात दाटतो...

तरी लेक्चर्स चालू राहतात
डोक्यात काही घुसत नाही...
चित्र विचित्र फिगर्स शिवाय
बोर्ड वर काहीच दिसत नाही...

तितक्यात कुठून तरी फंक्शनची
डेट जवळ येते...
सेमीस्टर मधले काही दिवस
नकळत चोरून नेते...

नंतर लेक्चर्स एक्स्ट्रा घेऊन
भराभर शिकवत राहतात...
लायब्ररीमधील पुस्तक वाचायला सांगून
सिलॅबस लवकर संपवू पाहतात...

पुन्हा हात चालू लागतात
मन चालत नाही...
सरांशिवाय वर्गामध्ये
कुणीच बोलत नाही...

लेक्चरर्स संपून
सुरू होतो पुन्हा खेळ...
प्रोजेक्ट पूर्ण करण्यामध्ये
फार फार जातो वेळ...

चक्क डोळ्यासमोर सिलॅबस
चुटकी सरशी संपून जातो...
दिवसरात्र वाचूनसुध्दा
पेपर का बर... सो...सो...च जातो?

वेलिंडा लुद्रिक
F.Y.B.A.

आमचो मालवणी माणूस...

मालवणी माणसा प्रेमाची भूकेली,
शाबासकीचो दोर घेवन माडार चढतली,
चढता चढता मध्येच खाली पडतली,
तोंडार आपटली तरी ही..ही..करतली,..

स्वतः भूकी रवतली,
पावन्याक जेवक घालतली,
तूप खालय म्हनांन सांगतली,
हजार रूपयाची वस्तू धा रूपयाक मागतली,
मिळाली नाय ती खराब म्हनान सांगतली,
चतुर्थीची आतुरतेन वाट बघतली,
गणपतीत जोरात आरती भजना गातली,
शिगम्याक जोशात सोंगा नाचवतली,
दशावतारी नाटक बघीत थयच रवतली,
जत्रेचा खाजा चार दिवस खातली...

मालवणी माणसा ही अशीच रवतली,
फसली गेली तरी नाय म्हनतली,
हसणाऱ्याक रडवतली,
रडणाऱ्याक हसवतली,
गुणगान करता करता,
मधीच गाळीय घालतली,
असो आमचो मालवणी माणूस...

वेलिंडा लुद्रिक
F.Y.B.A.

परत एकदा भेटूया ना यार.....
BACK TO SCHOOL

वर्गात नव्हती आपली
एवढी एकमेकांशी दोस्ती
पण आता आठवतेय यार
केलेली ती सगळी मस्ती

वर्गातल्या प्रत्येकाची
एन्ट्रीच होती भारी
कधी कधी एन्जॉय केलीय
वर्गातली मारामारी.....

होतो शिक्षकांच्या डोक्याला ताप
कारण होतेच सगळं तसे कलाकार
पण आज प्रत्येक क्षणाला तुमची
आठवण येते यार.....

आयुष्याच्या एका टोकावर
झालो आपण वेगळे
आपापल्या कामामध्ये आता
गर्क असतो सगळे.....

कॉलेजमध्येही भेटले मित्र मैत्रिणी
करतो आता ही मस्ती सगळी
पण शाळेमधल्या दोस्तीची
गोष्टच होती वेगळी
गोष्टच होती वेगळी.....

गौरी विजय मुंबरकर
F.Y.B.A.

स्त्री सक्षमीकरण काळाची गरज

पूर्वीच्या काळात स्त्रीयांच्या बाबतीत खूप वाईट परिस्थिती होती. स्त्रीयांना घराबाहेर पडण्यास मनाई, अंधश्रद्धा व जून्या पंरपरानुसार माणसे वागत होती. स्त्री म्हणजे फकत घरातील काम करणार व पुरूषांनी शिक्षण घ्यायचं असा त्या काळातील लोकांचा गैरसमजच. स्त्री म्हणजे चूल आणि मूल अशा अनेक प्रथा मानल्या जात असत.

त्यानंतर सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली. त्या स्वतः त्यांच्या घरी जाऊन मुलींला घेऊन यायचे. त्यांना शिकवायचे व पुन्हा घरी नेऊन सोडायचे. पण त्यांच्या घरातील पालक मुलींना शाळेत पाठवण्यास तयार नसत. म्हणून सावित्रीबाई फुले त्या पालकांना समजवायचे प्रयत्न करत. काही पालक पाठवायचे व काही पालक मुलींना शाळेत पाठवण्यास तयार नव्हते. सावित्रीबाई येतात तेवढया मुलींना घेऊन जायच्या. पण त्यांच्या अंगावर जाताना शेण, दगड, माती असे फेकणारे व्यक्ती असायचे यावर त्यांनी काही लक्ष दिला नाही. त्यांच एकच ध्येय होते ते म्हणजे मुलींना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावं व मुलीपण चांगल्या प्रकारे स्पर्धेत सहभागी व्हाव्यात असा त्यांचा निश्चय होता.

सावित्रीबाईंनी काही पालकांना समजावून सांगितल. शिक्षणाच महत्व काय आहे. त्यानंतर मुलींना शाळेत पाठवायला लागले. काही दिवसांनी एक मुली शाळेत जाताना बघून बाकीच्या मुलीपण जात असत. हे बघून सावित्रीबाई फुले यांना खूप चांगल वाटलं.

सावित्रीबाईंनी मुलींना योग्यप्रकारे शिक्षण दिलं. त्याच शिक्षणाचा परिणामामुळे थोडी स्थिती बदलत गेली शिक्षणाचे फायदे दिसून आले व मुलांप्रमाणे मुली समान भेदभाव नाही असे समजते.

स्वातंत्र्यापूर्व काळात भारतात स्त्री चळवळी सुरू झाल्या. पुरोगामी पुरूषांच्या पुढाकाराने झाली. स्त्रीयांवर होणार अन्याय, त्यांचे शोषण थांबून त्यांना सन्मानाने जगता यावे व सार्वजनिक जीवनात सहभाग घेता यावा यासाठी अनेक सुधारणा चळवळी सुरू केल्या. ईश्वरचंद्र विदयासागर, राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्या पुढाकारामुळे स्त्री सतीच्या प्रथेला विरोध, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण, बालविवाहास विरोध स्त्रियांना मतदानाचा अधिकार यांसारख्या सुधारणा झाल्या.

स्वातंत्र्योत्तर काळापासून महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नांना सुरूवात झाली. महिलांमधील निरक्षरता दूर करणे, त्यांना विकासाच्या पुरेशा संधी देणे यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर महिलांच्या समस्यांची दाखल घेऊन काही धोरणे निश्चित करण्यात आली.

वडिलांच्या व पतीच्या संपत्तीत महिलांना समान वाटा, हुंडाप्रतिबंधक कायदा, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा अशा काही महत्वपूर्ण तरतूदींनी महिलांना त्यांचे स्वातंत्र जपण्यास आणि स्वतःचा विकास साधण्यास अनुकूल वातावरण निर्माण केले.

भारतामध्ये 73 व्या व 74 व्या घटनादुरूस्तीने सीानिक शासनसंस्थामध्ये 33% जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या. त्यानंतर हे प्रमाण महाराष्ट्रासह अनेक राज्यामध्ये 50% पर्यंत वाढवण्यात आली आहे.

महिलांसाठी राष्ट्रीय महिला आयोग सीापन करण्यात आला. राज्यामध्येही राज्य महिला आयोग आहे. घरगुती हिंसाचारापासून महिलांना सरंक्षण देणारा कायदा हे लोकशाहीकरणाला पोषक आलेले महत्वाचे पाऊल आहे. स्त्रीची प्रतिष्ठा व आत्मसन्मान राखण्याची आवश्यकता या कायदयाने केली.

भारत सरकारने स्त्रियांसाठी न्याय मागणे हा हक्क दिला आहे. त्यामुळे प्रत्येक स्त्रीला जर संकट आलं तर त्या संकटाला सामोरे जावे लागते. स्त्रीयांमध्ये देखील सक्षमपणा असायला हवा म्हणून असे कायदे सरकारने केलेले आहे. व आताच्या युगामध्ये स्त्रीयांदेखील पुरूषांच्या बरोबरीने उच्च प्रतिचे शिक्षण घेतात व उच्च प्रकारच्या नोकरीच्या संधी महिलांनादेखील आहेत. त्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षण देण्यासाठी स्वतः त्रास सहन करून मुलींना शिक्षण दिले त्याचे अनेक फायदे झालेले दिसून येतात यासाठी स्त्री सक्षमीकरण काळाची गरज आवश्यक आहे.

आताच्या युगामध्ये स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीने कामे करतात तसेच नोकरीच्या संधीत शिक्षक, डॉक्टर, वकील, पोलिस, नर्स इत्यादी संधीत सहभागी होऊन आम्ही स्त्रीयांदेखील कोणत्याही कामात कमी नाही हे दाखवून दिले व पूर्वीपेक्षा आताच्या युगामध्ये स्त्रीयांच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक संकटाला कायदा केल्यामुळे स्त्रीया सक्षम झाल्या आहेत

रसिका लाडू मेस्त्री
अकरावी कॉमर्स

शब्दकोडी

1) प्रश्न असा आहे की उत्तर काय? – दिशा

2) एवढसं कार्ट घर कसं राखत – कुलुप

3) इथेच आहे पण दिसत नाही – वारा

4) दोन भाऊ शेजारी, भेट नाही जन्मातरी – डोळे

5) पांढरं पातेलं पिवळा भात – अंड

6) तिखट, मीठ, मसाला चार शिंग कशाला – लवंग

7) सुपभर लाहया त्यात एक रूपया – चंद्र आणि चांदण्या

8) हिरवी पेटी काटयात पडली, उघडून पाहिली तर मोत्याने भरली – भेंडी

9) तीन पायांची तिपाई, वर बसला शिपाई – चूल आणि तवा

10) एवढीशी नन्नुबाय, साऱ्या वाटनं गीत गाय – शिट्टी

11) काळया रानात हत्ती मेला त्याला पृष्ठभाग उपसून नेला – कापूस

12) तीनजण वाढायला बाराजण जेवायला आणि एक ताट – घडयाळ

13) सगळे गेले रानात, अन् झिपरी पोरगी घरात – केरसुणी

14) सोन्याची सुरी भुईत पुरी, वर पटकार गमजा करी – गाजर

रत्नप्रभा प्रमोद आढाव
अकरावी कला

खरा देव कोण ?

काय आहे देव ? माणसाची एक कल्पना. कसली वेगळी कल्पना आहे ही! ह्या देवासाठी कित्त्येक लोक आपला मूल्यवान वेळ, पैसा, साधन संपत्ती द्यायला तयार होतात. मला तर या कल्पनेबद्दल खूप प्रश्न पडतात.

संत कबीर म्हणतात,

पाहन पूजे हरि मिलौ, तो मै पुजू पहार
ताते यह चाकी भली, पीस खाया संसार.

संत कबीर म्हणतात, दगडाच्या मूर्तीची पूजा करून मला देवाचे दर्शन होत असेल, तर मी दगडापासून बनलेल्या पर्वताची मी पूजा करीन. संत कबीर म्हणतात त्या दगडाच्या मूर्ती पेक्षा दगडच जात उत्कृष्ट आहे, त्याने दळलेले धान्य सर्व जग खाते. ते बरोबरच म्हणतात, त्या प्लास्टीकच्या फोटोला पाया पडून काही मिळत, तेच जर तुम्ही एक झाड लावून, त्याची पूजा करा म्हणजे दिवा वगैरे लावणे नव्हे तर त्या झाडाला पाणी द्या शेण खत, सेंद्रिय खत द्या, चांगली देखभाल करा. ही खरी पूजा झाडाची! झाडाचीच पूजा का करावी कारण, झाडे आपल्याला सर्वात मौल्यवान ऑक्सिजन देतात. आपल्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या अत्यवश्यक गरजा पूर्ण करतात. ते प्लास्टिकचे फोटो आणि दगडाच्या मूर्त्या काही नाही देत.

या अल्ला, ईश्वर, गॉड या सर्व गोष्टीमुळे माणसात भेदभाव निर्माण होतात सर्व स्वतःच्या देवाला श्रेष्ठ बनवायला दुसऱ्यांना कमी समजतात, मारामारी करतात. ह्या देवापुढे कितीतरी लोक बळी पडतात आपण केलेली कमाई त्या दगडापुढे नेऊन ठेवतात. त्या देवामागे अनेक ढोंगी बाबा साधू अशिक्षित आणि शिकलेली माणसाला फसवतात. ह्या देवामुळे अनेक दंगली, अतिरेकी सुद्धा निर्माण होतात अनेक अंधश्रद्धांना बळी पडतात उदा.एखादा माणूस जातो तिथे बसलेल्या साधूला सांगतो की माझी बायको मागील दोन आठवड्यपासून आजारी आहे व डॉक्टरांनी पण हात टेकले त्यवर साधू म्हणतो तू इथून काश्मीरला जाणारी ट्रेन पकड आणि काश्मिरला जा तिथे एक शंकरच मंदिर आहे तिथे हिच अडचण सांग आणि तिथला प्रसाद घे आणि आपल्या बायकोला दे अस सांगितल्यावर काय बोलायचं? आता तो शंकर येऊन ठिक करणार आहे का त्याच्या बायकोला?

उलट तो गृहस्थ आपल्या बायको बरोबर चार दिवस राहणार होता ते सुद्धा अशा अंधश्रद्धेने गमावले. काहीजण गंभीर आजार झाल्यावर डॉक्टरकडे न जाता देवाकडे जातात. ह्याचाच फायदा ढोंगी साधू घेतात आणि माणसाला लुटतात आणि तरीही माणसे त्यावर विश्वास ठेवतात

